International Journal of Social Research and Development
www.socialsciencejournal.net
Online ISSN: 2664-8709
Received: 21-12-2025, Accepted: 20-01-2026, Published: 04-02-2026
Volume 8, Issue 1, 2026, Page No. 30-32

# भारतातील कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीचे आधुनिक प्रवाह

**डॉ. उदय खंडू टेके, डॉ. राहुल बिन्निवाल**
प्रोफेसर, सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विभाग, म.स.गा.महाविद्यालय (स्वायत्त), मालेगाव कॅम्प, महाराष्ट्रा, भारत

**सारांश**
कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) हे भारतातील व्यवसायांसाठी सामाजिक आणि पर्यावरणीय क्षेत्रामध्येयोगदान देण्यासाठीएक प्रभावी साधन म्हणून उदयास आले आहे. ही जबाबदारी सुरूवातीला मोठ्या कंपन्यांनी सद्भावनेतून स्वच्छेने स्वीकारली, परंतु वर्तमानकाळात कंपनी कायद्यानुसारयाचे रूपांतर अनिवार्य झाले आहे. कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १३५ अंतर्गत भारतातील कंपन्यांना C.S.R. आदेश लागू करण्यात आला. C.S.R. उपक्रम अनिवार्य केल्यामुळे वर्तमान काळात भारतातील कंपन्यांच्या C.S.R. खर्चात लक्षणीय वाढ झाली आहे. कंपन्या त्यांच्या सामाजिक आणि पर्यावरणीय परिणामांसाठी अधिक जबाबदार बनल्या आहेत.या लेखामध्ये भारतातील कंपन्यांनी पाठीमागील पाच वर्षात केलेल्या C.S.R. उपक्रमांतर्गत सामाजिक हिताच्या उपक्रमावर केलेल्या खर्चाचा आढावा घेतला आहे.

**मूलशब्दः** कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (CSR) कंपनी कायदा २०१३ (कलम १३५) सामाजिक व पर्यावरणीय योगदान CSR खर्च सामाजिक हिताचे उपक्रम

कंपन्यांची सामाजिक जबाबदारी (C.S.R.) म्हणजे, कंपन्या ज्या समाजामध्ये काम करतात त्या समाजाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी कंपन्यांनी सतत केलेले समर्पण होय. कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता समाजाच्या भल्यासाठी प्रयत्न करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहेयाची जाणीव ठेऊन कंपन्यांनी काम करणे होय. कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) म्हणजे असे व्यवसाय मॉडेल (प्रतिमान) ज्यामध्ये कंपन्या नफा कमावण्यापलीकडे सामाजिक आणि पर्यावरणीय हित त्यांच्या कामकाजात समाविष्ट करतात. कंपन्यांना समाजात सकारात्मकयोगदान देण्याचा हाएक मार्ग आहे. कर्मचारी, ग्राहक, समाज आणि पर्यावरणासह विविध भागधारकांवर (stakeholders) होणाऱ्या परिणामाची जबाबदारी घेणे कंपन्यांची सामाजिक जबाबदारी (C.S.R.) मध्ये अपेक्षित आहे.

### भारतातील सी. एस. आर.

भारत सरकारच्या कंपनी व्यवहार मंत्रालयाने २०१३ मध्ये कंपनी कायदा लागू केला.या कायद्यानुसार सामाजिक कल्याणकारी उपक्रमांसाठी कंपन्यांवर सी.एस.आर. प्रकल्प हाती घेण्याचे वैधानिक बंधन टाकून सी.एस.आर.ला अनिवार्य केले.यामुळे भारत हा जगातलाएकमेव देश बनला आहे ज्यानेया कायद्याअंतर्गत नोंदणीकृत कंपन्यांसाठी सी.एस.आर. उपक्रम राबवणे बंधनकारक केले आहे. हा सी.एस.आर. उपक्रम देशाला शा वत विकास उद्दिष्टे सार्वजनिक आणि खाजगी भागीदारीद्वारे साध्य करण्यासाठी प्रेरक ठरेल अशीया कायद्याची अपेक्षा आहे.

भारतीय कंपनी कायदा, २०१३ नुसार भारतातील कंपन्यांना कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सी.एस.आर.) उपक्रम राबवणे अनिवार्य केले आहे. त्यासाठी कंपन्यांच्या पात्रतेचे विशिष्ट निकष (महसूल,नफा आणि निव्वळ संपत्तीच्या आधारे) दिले आहेत. खालीलपैकी कोणत्याही अटी/निकष पूर्ण करणाऱ्या कंपन्यांना त्यांच्या मागील तीन वर्षातील सरासरी निव्वळ नफ्याच्या किमान २% इतकी रक्कम सी.एस.आर. उपक्रमांवर खर्च करणे आवश्यक/बंधनकारक आहे.

- ज्या कंपन्यांची निव्वळ मालमत्ता ५०० कोटी रुपये किंवा त्याहून अधिक असेल,
- ज्या कंपन्यांची वार्षिक उलाढाल १,००० कोटी रुपये किंवा त्याहून अधिक आहे,
- ज्या कंपन्यांचा निव्वळ नफा ५ कोटी रुपये किंवा त्याहून अधिक आहे.

या कंपन्यांनी त्यांचे सी.एस.आर. उपक्रम राबवताना कंपनी कायद्यातील मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगत आहेत अशा उपक्रमावर हा निधी खर्च करावा ही अपेक्षा आहे. ज्यामध्ये शिक्षण, आरोग्यसेवा, ग्रामीण विकास, दारिर्द्य निर्मूलन, कुपोषण निर्मूलन आणि पर्यावरणीय शा वततायासारख्या क्षेत्रातयोगदान देत आहेतयाची खात्री करावी.या निकषांखालीयेणाऱ्या कंपन्यांनी त्यांच्या सी.एस.आर. उपक्रम ठरविण्यासाठी स्वतंत्र धोरण तयार करावे व सी.एस.आर. उपक्रमाचे प्रभावीपणे निरीक्षण आणि देखरेख करण्यासाठीएक स्वतंत्र सी.एस.आर. समिती स्थापन करणे देखील अपेक्षित आहे.

### भारतातील सी. एस. आर. उपक्रम खालील क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करतात

**शाश्वतताः** पर्यावरणीय प्रभाव कमी करणे, अक्षय ऊर्जेला प्रोत्साहन देणे आणि घन–कचरा कमी करणे.

**परोपकारः** देणग्या, धर्मादाय कार्य आणि मागास समुदायांना मदत करण्र्याया स्वयंसेवी संस्थांना मदत देणे. नैतिक कामगार पद्धतीःयोग्य वेतन, सुरक्षित कामाच्या परिस्थिती सुनिश्चित करणे आणि मानवी हक्कांचा आदर करणे.

**समुदाय विकासः** शिक्षण, आरोग्यसेवा, पायाभूत सुविधा आणि ग्रामीण विकासात गुंतवणूक करणे.

**विविधता आणि सर्वसमावेशकताः** लिंग, वंश किंवा पा र्वभूमी काहीही असो, सर्वांसाठी समान संधीची निर्मिती करणे. थोडक्यात, सी.एस.आर. केवळ कंपनीची प्रतिमा सुधारण्यास मदत करत नाही तर शा वत विकास आणि सामाजिक कल्याणाच्या व्यापक ध्येयात देखीलयोगदान देते.


### भारतातील सी. एस. आर. खर्चाची वर्तमान स्थिती

वर्तमान आकडेवारीनुसार, कंपन्यांनी खर्च केलेल्या भारतातीलएकूण सी. एस. आर. मध्ये सातत्याने वाढ झाली आहे, ज्यामध्ये शिक्षण, आरोग्यसेवा, पर्यावरण आणि ग्रामीण विकासयासारख्या विविध क्षेत्रांमध्ये भरीवयोगदान देण्यात आले आहे.

**तलिका १:** एकूण कंपन्यांची संख्या

| कंपन्या | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|
| नॉन पी.एस.यू. (खाजगी उपक्रम/कंपन्या) | २२५०२ | २०३९२ | १९८३४ | २५९४० | २६८१४ |
| पी.एस.यू. (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम/कंपन्या) | ४८३ | ४४८ | ४०० | ४३७ | ३७४ |
| एकूण | २२९८५ | २०८४० | २०२३४ | २६३७७ | २७१८८ |

**संदर्भः** https://www.csr.gov.in/content/csr/global/master/home/home.html





तक्ता क्रमांक ०१ मध्ये सी.एस.आर.खर्च करर्णाया कंपन्यांचीएकूण संख्या दर्शवली आहे.या कंपन्यांचे वर्गीकरण खाजगी उपक्रम/कंपन्या आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम/कंपन्याया दोन गटात केले आहे.यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यापेक्षा खाजगी क्षेत्रातील कंपन्यांची संख्या जास्त दिसूनयेते.२०१६–२० पासून २०२३–२४ पर्यंत खाजगी कंपन्यांची संख्या दरवर्षी वाढत गेल्याचे दिसूनयेते,अपवाद फक्त २०२२०–२१ व २०२१–२२या दोन वर्षाचा आहेया वर्षात ही संख्या कमी झाली आहे,परंतु पुढील दोन वर्षात ही संख्या पुन्हा वाढल्याचे दिसते.याउलट सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांची संख्या मात्र दरवर्षी कमी होत असल्याचे दिसते.या दोन्ही क्षेत्रातील कंपन्यांचीएकत्रित संख्या विचारात घेतली असता सी.एस.आर.उपक्रम राबवर्णायाएकूण कंपन्या वाढत असल्याचे दिसते.ही वाढ २०१६–२० च्या तुलनेत २०१३ –२४ पर्यंत १८.२८ः इतकी आहे.

**तलिका २:** सी. एस. आर. वर खर्च केलेलीएकूण रक्कम (रक्कम कोटीमध्ये)

| कंपन्या | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|
| नॉन पी.एस.यू. (खाजगी उपक्रम/कंपन्या) | १९६५५.७ | २१७२४.६८ | २२७३४.२८ | २६८१९.९९ | ३०१३५.५९ |
| पी.एस.यू. (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम/कंपन्या) | ५३१०.१२ | ४४८६.२७ | ४४०७.१७ | ४११२.०८ | ४७७३.१७ |
| एकूण | २४९६५.८२ | २६२१०.९५ | २७१४१.४५ | ३०९३२.०७ | ३४९०८.७६ |

**संदर्भः** https://www.csr.gov.in/content/csr/global/master/home/home.html





तक्ता क्रमांक ०२ मध्ये सी.एस.आर.उपक्रमावर केलेला खर्च दिला आहे. खर्च करर्णाया कंपन्यांचे वर्गीकरण खाजगी उपक्रम/कंपन्या आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम/कंपन्या दोन गटात केले आहे.यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यापेक्षा खाजगी क्षेत्रातील कंपन्यांनी सी.एस.आर.उपक्रमावर तुलनेने जास्त खर्च केल्याचे दिसूनयेते. २०१६–२० पासून २०२३–२४ पर्यंत खाजगी कंपन्यांचा सी.एस.आर.उपक्रमावरील खर्च सातत्याने वाढत असल्याचे दिसते. ही वाढ २०१६–२० च्या तुलनेत २०२३–२४ पर्यंत ५३.३१ः इतकी आहे.सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांचा मात्र सी.एस.आर.उपक्रमावरील खर्च मात्र कमी झाल्याचे दिसत आहे.या दोन्ही क्षेत्रातील कंपन्यांचाएकत्रित खर्च विचारात घेतला असता सी.एस.आर. उपक्रमावरीलएकूण खर्च सुद्धा सातत्याने वाढत असल्याचे दिसते. ही वाढ २०१६–२० च्या तुलनेत २०२३ –२४ पर्यंत ३६.८२ः इतकी आहे.

**तलिका ३:** क्षेत्रनिहायएकूण खर्चाची रक्कम (रक्कम कोटीमध्ये)

| विकास क्षेत्र | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षण (१) | ७१७९.५१ | ६६९३.२५ | ६७१९.८९ | १०४१४.९३ | १२१३४.५७ |
| आरोग्य सेवा (२) | ४९०५.७२ | ७३२५.८३ | ८०४९.४९ | ७०२३.६ | ७१५०.८१ |
| ग्रामीण विकास प्रकल्प (३) | २३०१.०२ | १८५०.७१ | १८४७.०७ | २०५९.४१ | २४०८.०९ |
| पर्यावरणीय शाश्वतता (४) | १४७०.५३ | १०३०.१६ | २४४१.८२ | २००८.०४ | २४२९.९७ |
| दारिद्र्य, उपासमार निर्मूलन, कुपोषण (५) | ११५९.७१ | १४०७.५८ | १९०३.७८ | १२८२.७३ | १२३३.९३ |
| व्यावसायिक कौशल्ये (६) | ११८१.२३ | ७१७.६५ | १०५३.८ | १२०६.७५ | १३९६.५५ |
| पशू कल्याण | १०६.१२ | १९३.५५ | १७४.३५ | ३२५.४४ | ५३१.१४ |
| उपजीविका वाढ प्रकल्प | १०७७.७२ | ९३८.९१ | ८८०.५ | १७०३.६४ | २३६०.०९ |
| पुढील/उल्लेखित नाही | ५०२.७९ | २०३.१४ | ०.५९ | १.६५ | ६८.३२ |
| खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रशिक्षण | ३०४ | २४३.३९ | ३११.७१ | ५४२.५३ | ६९२.०९ |
| कृषी वनीकरण | ६७.३८ | २०.९ | ३५.५२ | ६७.२८ | ७४.४७ |
| केंद्र सरकारचे इतर निधी | ९३२.१६ | १६१८.१७ | ३११.१४ | १८७.७ | २०८.१४ |
| विशेष शिक्षण | १९६.८८ | २०९.२४ | १११.०८ | ३१९.५ | ३९६.५७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन | १६०.६ | ९२ | २७४.९ | ५८४.६५ | ४२३.४७ |
| स्वच्छ भारत कोष | ५३.४७ | १६१.३५ | ३५.०५ | ५६.६९ | १४०.१२ |
| पंतप्रधानांचा राष्ट्रीय मदत निधी | ७९८.४३ | १६९८.३८ | १२२९.३५ | ८५५.२३ | ५८९.६१ |
| महिलांसाठी घरे आणि वसतिगृहे उभारणे | ४८.५ | ४४.५२ | १०१ | ४९.५ | ४१.८ |
| महिला सक्षमीकरण | २५९.५७ | २०६ | २६४.९४ | ४१७.२६ | ४५४.२२ |
| सुरक्षित पेयजल | २५३.४ | २०३.१३ | १९२.३४ | २५२.७८ | ३२७.४५ |
| तंत्रज्ञान इनक्यूबेटर | ५३.५ | ६२.६२ | ८.५७ | १.४८ | १.९१ |
| अनाथाश्रम उभारणे | ३६.५ | २१.८८ | २७.५४ | ४४.९९ | ३१.५७ |
| लिंग समानता | ८२.९३ | ४३.८३ | १०४.९७ | १२१.१५ | २०४.१७ |
| स्वच्छता | ५२१.७२ | ३३८.९७ | ३१४.५३ | ४३८.८१ | ३७५.२३ |
| झोपडपट्टी क्षेत्र विकास | ४२.९४ | ८८.९५ | ५८.३८ | ९४.२२ | ३८.८२ |
| ज्येष्ठ नागरिक कल्याण | ५२.३३ | ५६.४७ | ८०.३४ | १५३.९१ | १५९.८२ |
| सशस्त्र दल, माजी सैनिक, युद्ध विधवा/आश्रित | ६२.०६ | ८४.०५ | ४७.६५ | ६३.६३ | ६८.०४ |
| सामाजिक-आर्थिक समानता | २१४.८८ | १४९.८१ | १६५.३ | १५९.१९ | २००.८१ |
| स्वच्छ गंगा निधी | ६.६३ | १३.३९ | ५५.४६ | ४६.१५ | ६२.९६ |
| कला आणि संस्कृती | ९३३.५७ | ४९३.१३ | २६०.३९ | ४४९.२१ | ७०४.०४ |
| एकूण | २४९६५.८२ | २६२१०.९५ | २७१४१.४५ | ३०९३२.०७ | ३४९०८.७६ |




https://www.csr.gov.in/content/csr/global/master/home/home.html

भारतातील कंपन्यांनी सी.एस.आर.उपक्रमाअंतर्गतएकूण २६ क्षेत्रावर खर्च केला आहे.त्यापैकी सर्वात जास्त म्हणजे रु.४३१४२.१५ कोटी इतका खर्च शिक्षणावर केला आहे.त्याखालोखाल रु.३४४५५.४५ कोटी इतका खर्च आरोग्य सेवेवर केला आहे. त्यानंतर १०४६६.३० कोटी ग्रामीण विकास प्रकल्प,रु.६३८०.५२ कोटी शा वत पर्यावरण, दारिद्र्य, उपासमार व कुपोषण निर्मूलनावर रु.६६८७.७३ कोटी व रु.५५५५.६८ इतका खर्च व्यावसायिक कौशल्य वाढीवर केल्याचे दिसते.या कंपन्यांनी सी.एस.आर. उपक्रम राबवताना कंपनी कायद्यातील मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगत आहेत अशा उपक्रमावरच खर्च केल्याचे दिसते.

## निष्कर्ष

भारतातील कंपन्यांनी स्वच्छेने स्वीकारलेल्या सामाजिक जबाबदारीचे रूपांतर कायद्याने अनिवार्य केल्यामुळे वर्षानुवर्षे ही जबाबदारी पार पडणीया कंपन्यांच्या संख्येमध्ये व सामाजिक हिताच्या उपक्रमावरील खर्चामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत असल्याचे दिसते.

## संदर्भ सुची


1. Khanna, Parrul, Gupta, Gitika. Status of Corporate Social Responsibility: in Indian context. APJRBM,2011:2(1):2229-4104
2. Usha L. Corporate Social Responsibility in India-A way to Socio Economic Development, Indian journal of applied research,2012:2(2):2249-555X.
3. Swati Sharma1, Reshu Sharma2, Jugal Kishor- Emerging Trends in Corporate Social Responsibility in India- A Descriptive Study-global journal of commerce and management perspective.
4. https://www.csr.gov.in/content/csr/global/master/home/home.html
5. https://missionsustainability.org/blog/csr-in-india/
6. https://proteantech.in/articles/current-sector-wise-allocation-in-csr-05112024/